**State Level Volleyball Tournament Concluded**

लोकमत



विजयी मुले व मुलींच्या संघासोबत फारुक शेख, एल. पी. देशमुख, अनिल जोशी, रत्नाकर गोरे, अरविंद गवई, पुरुषोत्तम पंत, अंजली पाटील आदी.

# व्हॉलीबॉल स्पर्धेत लातूरच्या मुला, मुलींच्या संघाने पटकाविले विजेतेपद

## नागपूर उपविजेते तर मुंबई तृतीयपदी; स्पर्धेचा समारोप

लोकमत न्यूज नेटवर्क

**जळगाव** : नूतन मराठा महाविद्यालयाच्या बंदिस्त मैदानात सुरू असलेल्या ४८ व्या राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेत लातूरच्या संघाने मुला-मुलींच्या गटात दबदबा दाखवित अंतिम विजेतेपद मिळविले आहे. तर नागपूर संघाच्या मुला व मुलींच्या संघाने उपविजेतेपद तर मुंबईच्या मुलामुलींच्या संघाला तृतीय पदावर समाधान मानावे लागले.

जळगाव येथे १ डिसेंबर पासून सुरू असलेल्या आंतर विभागीय राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेचा समारोप झाला. सायंकाळी स्पर्धेच्या पारितोषिक कार्यक्रमास विवेकानंद प्रतिष्ठानचे सचिव रत्नाकर गोरे, जैन इरिगेशन सिस्टीम लिमिटेडचे अनिल जोशी, नूतन मराठा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल. पी. देशमुख, नंदलाल गादीया, रेफ्री बोर्डचे चेअरमन पुरुषोत्तम पंत, महाराष्ट्र राज्य संघटनेचे उपाध्यक्ष तथा जिल्हा अध्यक्ष फारुक शेख, राज्य संघटनेचे खजिनदार अरविंद गवळी, दत्ता सोमवंशी, जिल्हा संघटनेच्या सचिव अंजली पाटील यांच्या हस्ते खेळाडूंना पारितोषिके देण्यात आली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मंजुषा भिडे यांनी केले. आभार अंजली पाटील, विनोद पाटील यांनी मानले.

### स्पर्धेचा निकाल

#### अंतिम सामन्याचा निकाल

मुलींच्या गटात लातूर विरुध्द नागपूर यांच्या सामन्यात लातूर संघ विजयी, मुलांच्या गटात लातूर विरुध्द नागपूर यांच्यात झालेल्या सामन्यात लातूर संघ विजयी झाला.

#### उपांत्य फेरीचे सामने

**मुलींच्या गटात** : लातूर विरुध्द नाशिक यांच्या सामन्यात लातूर संघ विजयी, नागपूर विरुध्द मुंबईच्या सामन्यात नागपूर विजयी, **मुलांच्या गटात**: नागपूर विरुध्द पूणे यांच्यात झालेल्या सामन्यात नागपूर संघ विजयी तर लातूर विरुध्द मुंबईमध्ये झालेल्या सामन्यात लातूर संघ विजयी.

#### तृतीय स्थानासाठी झालेले सामने

तृतीय स्थानासाठी मुलींच्या गटात मुंबई विरुध्द नाशिक यांच्यात मुंबई संघाने विजय मिळविला. तर मुलांच्या गटात मुंबई विरुध्द पुणे संघात मुंबई संघाचा विजय झाला.

Jalgaon Main
Page No. 4 Dec 04, 2023
Powered by: erelego.com